## कधी कधी

कधी कधी
तुला अनुभवण्यातच
जास्त काव्य असतं..
तू म्हणत रहातोस,
लिही ना काहीतरी,
हो प्रवाही; शब्दांतून..
पण मला बरं वाटत असतं
थोडसं थांबायला,
श्वासांचं गाणं गायला,
तुझ्या डोळ्यांत
बुडून जायला..
जे शब्दांत मावणार नाही
असं काहीसं टिपायला..
जितके हे क्षण मुरू देते मनात
तितका ओलावा मिळतो
माझ्या शब्दांना,
कोणाची अनावर भावना
पुढल्या कवितेतून
बाहेर काढायला..
म्हणून म्हणते,
झिरपू दे मला मिठीत तुझ्या
रूजू दे उद्याच्या कवितेचा अंकूर
आजच्या अबोल, नि:शब्द क्षणांत..

**© प्रीती देशपांडे**
**www.meetipreeti.com**